# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१६/२०२३** **दिनांक २१/११/२०२३**
**स्थळ- जिल्हा न्यायालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ०४.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सी.ए. नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.२१/११/२०२३ रोजी दुपारी ०४.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/२९६१/२०२३, दि.१७.११.२०२३ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.२१/११/२०२३ रोजी दुपारी ०४.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगडडा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा. श्री. सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**मा. श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

**मा. श्री. पी. शिवा शंकर, भा.प्र.से.,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

---

**विषय नं.१** **दि.१७.१०.२०२३ रोजी अहमदनगर झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र. ६७९** **दि.१७.१०.२०२३ रोजी अहमदनगर झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२** **चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१. श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील यांत्रिकीकरणासह स्वच्छतेचे कामकाज आऊटसोर्स पध्दतीने निम्नतम दरधारकाकडून करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.६८०/१** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**२. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२३-२४ या वार्षिक खरेदीमधील X-Ray, CT, MRI Films, Miscellaneous, O.T. Surgical, Neuro,O.T.Cathlab and Cardica O.T. Material करीता दर निश्चीती (Rate Contract) करणेकामी शासनाचे www.mahatenders.gov.in या वेबसाईटव्दारे पात्र कमर्शियल ई-निविदेतील प्राप्त निम्नतम दरानुसार पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देणेस व ज्या मटेरीअलकरीता दर प्राप्त झालेले नाहीत त्याकरीता फेर ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६८०/२** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---------------------------------------------------------------------------------------------------

**३. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२३-२४ या वार्षिक खरेदीमधील ई-निविदेत दर प्राप्त न झालेल्या On Consignment Basis Material, Suture, Ayurvedic व Dental Material करीता दर निश्चीती (Rate Contract) करणेकामी प्राप्त निम्नत्तम दराने पुरवठा आदेश देणेस व उर्वरीत ज्या मटेरीअल करीता दर प्राप्त झालेले नाहीत त्याकरीता कोटेशन मागवून खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.६८०/३** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**४. नवीन दर्शनरांग प्रकल्पातंर्गत Time Based मोफत दर्शनपास प्रणाली कार्यान्वीत करणेकामी प्रचलित पध्दतीने खरेदी प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६८०/४** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**५. साईबाबा समाधी मंदिर नविन अद्यायावत दर्शनरांग शिर्डीचे सुरक्षेकरिता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ कडील सुरक्षा घेणेबाबत.**

**निर्णय क्र.६८०/५** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

**(कार्यवाही-सरंक्षण विभाग)**

---

**६. आयकर कायद्यातील तरतूदींन्वये सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील अखर्चित उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.**

**निर्णय क्र.६८०/६** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

**(कार्यवाही-लेखाशाखा विभाग)**

---

**७. आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेवून शासनास सादर करणेस मान्यता मिळणेकामी फेरसादर.**

**निर्णय क्र.६८०/७** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.

**(कार्यवाही-लेखाशाखा विभाग)**

---

विषय नं.३ शिर्डी शहरातुन जाणा-या अहमदनगर-कोपरगाव (NH-160) या राष्ट्रीय महामार्गावर साईभक्तांसाठी साईआश्रम, साईबाबा भक्तनिवासस्थान, शिर्डी बसस्थानक, नवीन दर्शनरांग इमारत ते श्री साई प्रसादालय या ठिकाणी स्कायवॉक उभारणेकामी सल्लागार नेमणूकीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन RFP (Request For Proposal) मागविणेबाबत.

निर्णय क्र.६८१ स्कॉयवॉक आणि ओव्हरब्रिज यांचा तुलनात्मक अभ्यास करुन यापैकी कोणता पर्याय योग्य व किफायतशीर राहिल याबाबत सविस्तर प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

विषय नं.४ श्री साईबाबा संस्थानमार्फत नव्याने लेजर शो (Light & Sound Show) प्रकल्प BOT (Build-Operate-Transfer) तत्वावर उभारणेसाठी सल्लागार नेमणूक करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन RFP (Request For Proposal) मागविणेबाबत.

निर्णय क्र.६८२ विनामोबदला हे काम करण्यास कोणी तयार असल्यास त्यांचेकडून सदरचे काम करुन घेण्यात यावे.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.५ साईगार्डन प्रकल्पाअंतर्गत उभारणेत येणा-या लेजर शो प्रकल्पाचे ठेकेदार मे. लेजर व्हिजन लि. हॉंगकॉंग यांचे समवेतचे प्रस्तावीत आर्बिट्रेशनसाठी आर्बिट्रेटर नेमणूकीसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयात आर्बिट्रेशन पिटीशन दाखल करणेबाबत.

निर्णय क्र.६८३ मा. मुंबई उच्च न्यायालयात आर्बिट्रेशन पिटीशन दाखल केल्याची नोंद घेतली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.६ वाढीव संयुक्त पाणी पुरवठा योजना टप्पा क्र.१ चे योजनेकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नियुक्ती रद्द करणेबाबत तसेच सुधारीत योजना तयार करणेसाठी संकल्पन, अंदाजपत्रक तयार करणे, प्रकल्प व्यवस्थापन या सेवा घेणेसाठी तज्ञ व अनुभवी सल्लागारांकडून ई-निविदा प्रस्ताव मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.६८४ दि.१२/०४/२०२३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२९० प्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना देय असलेली रक्कम रु.६० लक्ष देण्यात यावी.

प्रस्तावातील अ.नं.२ मधील कामासाठी सल्लागार नियुक्त करण्यात यावा. त्यासाठी ई-निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावातील अ.नं.३ मध्ये उल्लेखीत काम उपरोक्त ठरावानुसार एमजेपी व संस्थानचे कार्यकारी अभियंता यांनी झालेल्या कामाची संयुक्त पाहणी करुन मुल्यांकन निश्चीत करावे. त्यानुसार एमजेपी यांचेशी करारनामा करुन त्यांना पीएमसी चार्जेस अदा करावे.

(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)

---

**विषय नं.७** M/S Egremontz Business Solutions Pvt Ltd, New Delhi यांचा श्री साईप्रसादालय व लाडू किचन करीता तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक करणे बाबतचा ईमेल अर्ज.

**निर्णय क्र.६८५** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

**विषय नं.८** मौजे शिर्डी, ता.राहाता येथील महाराष्ट्र शासन यांची सिटी सर्व्हे नं.९३ पै. क्षेत्र ९३.७ चौ.मिटर इतकी जागा ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना साईभक्तांचे सुविधेसाठी चप्पल स्टॅण्ड, लाडू काऊंटर व साईभक्तांना बसणेकामी सदर जागेवर बांधकाम करणेसाठी परवानगी मिळणेबाबत.

**निर्णय क्र.६८६** प्रस्ताव मंजूर. सदर जागा संस्थानकडे हस्तांतरीत करणेसाठी मा.जिल्हाधिकारी महोदय यांचेकडे प्रस्ताव सादर करावा. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.९** श्री साईबाबा संस्थानच्या मुंबईस्थीत साईनिकेतन या इमारतीतील राहत असलेल्या भाडेकरु यांची भाडेवाढ करणेबाबत.

**निर्णय क्र.६८७** प्रस्ताव मंजूर. नियमानुसार भाडेवाढ करावी.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१०** संस्थेस साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी संस्थान परिसरात भाडेतत्वावर वापरास दिलेले १० कियॉस्क/ गाळे पुढील ११ महिन्यासाठी मुदतवाढ मिळणेबाबत चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील जा.नं.श्रीसासंएक्रेसो/११४/२०२३, दि.२.१०.२०२३ रोजीचे पत्र.

**निर्णय क्र.६८८** दि.२२.०३.२०२३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१६ प्रमाणे त्याच अटी शर्तीवर भाडेवाढ करुन मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.११** संस्थेस साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी संस्थान परिसरात १२ ठिकाणी चालवत असलेले जागा /गाळे वापरास पुढील ११ महिन्यासाठी मुदतवाढ मिळणेबाबत चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.श्रीसासंएक्रेसो/११५/२०२३, दि.२.१०.२०२३.

**निर्णय क्र.६८९** दि.२२.०३.२०२३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१६ प्रमाणे त्याच अटी शर्तीवर भाडेवाढ करुन मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१२** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालकीचे मौजे निमगाव को-हाळे येथील जमीन गट नं.८७ पै.क्षेत्र २४.५ आर व गट नं.८८ पै.क्षेत्र २७.५ आर असे एकुण ०.५२ आर इतके महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस ३३/११ उपकेंद्रासाठी वापरास दिलेल्या जागेस मुदतवाढ मिळणेबाबत अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्था) स्थापत्य उपविभाग, महावितरण, अहमदनगर यांचेकडील पत्र अकाअ(स्था)/ बां व सु उपविभाग/अनगर/तांत्रिक/६२१ दि.२९/०९/२०२३.

**निर्णय क्र.६९०** यापुर्वी झालेल्या कराराप्रमाणे अखंडीत विद्युत पुरवठा करणे अपेक्षीत आहे. त्यानषंगाने वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तथापी समितीसमोर चर्चा करतांना एमएसइडीसीएल यांचेकडून अखंडीत विज पुरवठा होत नाही त्यामुळे संस्थानला जनरेटरचा वापर करावा लागतो. त्याचा विचार करुन दि.०९-१०.०८.२००३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३७१ अन्वये रु.१०१/- वार्षिक या नाममात्र भाडेकराराने झालेल्या करारामध्ये बदल का करण्यात येऊ नये याबद्दल एमएसइडीसीएल यांचेकडून खुलासा घेण्यात यावा.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१३** 'साईटेक प्रकल्प-२' अंतर्गत मे.टिसीएस यांचेमार्फत प्राप्त प्रस्तावीत अद्ययावतीकरण (संगणके व नेटवर्क) प्रस्तावास COPE, Pune यांचेमार्फत प्राप्त तांत्रिक मान्यतेनुसार याकामी खरेदी प्रक्रिया राबविणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.६९१** प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सी.ए. दाखल करण्यात यावा.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग/विधी विभाग)

---

**विषय नं.१४** संस्थानचे पाणी पुरवठा विभागासाठी ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम आणि क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

**निर्णय क्र.६९२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-खरेदी विभाग)**

---

**विषय नं.१५ संस्थान कायम व संस्थान कंत्राटी कर्मचा-यांना गणवेश देणेबाबत. (रु.९१,९०,०००/-)**

**निर्णय क्र.६९३ तहकुब.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१६ श्री विरभद्र मंदीर बिरोबा बन, शिर्डी येथील श्री विरभद्र महाराज यात्रेतील कुस्त्यांकरिता बिदागी म्हणून रक्कम रू. १,००,०००/- मात्र देणेबाबत.**

**निर्णय क्र.६९४ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१७ संस्थानचे भांडार गोडावून (पानमळा गोडावून) या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसवून कार्यान्वीत करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारकास कामाचा कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.६९५ निम्नतम दरधारकाच्या दराचा विचार करता, नियमाप्रमाणे अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम स्वीकारुन हा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही. प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल)**

---

**विषय नं.१८ सन २०२३-२४ करिता मोतीचूर लाडू व बर्फी प्रसाद तयार करून पॅकींग करून देणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदांमधील न्युनतम (L1)दरधारकांस कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.६९६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**विषय नं.१९ सन २०२४ या वर्षभरात येणा-या सण, उत्सवाकरीता मंदिर व मंदिर परिसरामध्ये फुलांची सजावट करणेकामी येणा-या रु.३५,०४,०००/-खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.६९७ चर्चा केली, वेळोवेळी गरजेनुसार कृषी उत्पन्न बाजार समितीचे दरानुसार खरेदी करण्यात यावी. प्रस्ताव नामंजूर. (कार्यवाही-बगीचा विभाग)**

---

विषय नं.२०   संस्थानमध्ये ठेकेदारामार्फत कार्यरत लेबर व सिक्युरिटी कंत्राटी कर्मचा-यांना रजा व सुट्टया लागू करणेबाबत.

निर्णय क्र.६९८ तहकुब. संस्थानचे माजी विश्वस्त मा.ॲड. श्री.जयकर यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

(कार्यवाही-कामगार विभाग)

---

विषय नं.२१   श्री साईबाबा संस्थान असंघटीत कंत्राटी कर्मचारी संघटना, शिर्डी यांचे समान काम समान वेतन लागू करण्याबाबतच्या मागणीबाबत.

निर्णय क्र.६९९ नोंद घेतली.

(कार्यवाही- कामगार विभाग)

---

विषय नं.२२   संस्थानचे सर्व निवासस्थानामध्ये खोली देतेवेळी साईभक्तांकडून अनामत (डिपॉझिट) रक्कम घेणेबाबत.

निर्णय क्र.७०० प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयामध्ये सी.ए. दाखल करण्यात यावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा भक्तनिवासस्थान/विधी विभाग)

---

विषय नं.२३   शैक्षणिक शुल्क माफ होणेबाबत.

निर्णय क्र.७०१ संस्थान प्रशासनाने दिलेल्या कारणांचा विचार केला. शैक्षणिक शुल्क हे नाममात्र आहे. अशी शैक्षणिक शुल्क माफिची मागणी इतर विद्यार्थ्यांचे पालक देखील करु शकतात व अशी शैक्षणिक शुल्क माफिची शिफारस इतर मान्यवरांकडून देखील येणे सुरु होईल म्हणून शैक्षणिक शुल्क माफ करण्याच्या धोरणाअभावी, संस्थान प्रशासनाचा अभिप्राय मान्य करण्यात येत आहे.

(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

विषय नं.२४   संस्थानला देणगी स्वरुपात प्राप्त होणा-या सोने चांदी वस्तू कस लावून तपासणी करून बाजारभावाप्रमाणे किंमत निश्चित करणेकामी, सोने-चांदी मुल्यांकनकार यांना मासिक मानधनावर दोन वर्षाकरीता मुदतवाढ देणेबाबत.

निर्णय क्र.७०२ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-लेखाशाखा)

---

**विषय नं.२५ लेखा विषयक नियमांस अनुसरून वस्तु स्वरुपात (Fixed Asset) देणगी प्राप्त झालेल्या देणगीचे मुल्य प्रत्येकी रु.१/- करून भक्तांस देणगी पावती देणेबाबत.**

**निर्णय क्र.७०३ विधी व न्याय विभागाकडून मार्गदर्शन मागविण्यात यावे.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२६ माहे मार्च-२०२३ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.७०४ नोंद घेतली. (कार्यवाही- लेखाशाखा)**

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२७ माहे एप्रिल व मे-२०२३ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.७०५ नोंद घेतली. (कार्यवाही- लेखाशाखा)**

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२८ माहे जून-२०२३ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.७०६ नोंद घेतली. (कार्यवाही- लेखाशाखा)**

-----------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२९ श्री साईनाथ रुग्णालयात माहे जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३ अखेर वैद्यकीय उपचार व औषधासाठी झालेल्या रक्कम २,८८,९४,५०३/- च्या खर्चाची नोंद घेऊन त्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७०७ प्रस्ताव मंजूर. नोंद घेऊन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

-----------------------------------------------------------------------------------------------

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१ संस्थानचे भांडार विभागासाठी जनरल कार्यालयीन स्टेशनरी साहित्य खरेदीकामी GeM निविदेत प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.७०८ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-खरेदी विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.२ श्री साईआश्रम नं. ०१, श्री साईबाबा भक्तनिवास ५०० रुम व साईआश्रम धर्मशाळा इमारत परिसरात असलेले गार्डनमध्ये खेळणी खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.७०९ प्रस्ताव मंजूर. मंजूर रकमेच्या अधिन राहून प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दरधारकाने दिलेल्या दरामध्ये तीन ऐवजी चार खेळणी सेट बसविण्यात यावेत.

(कार्यवाही-बगीचा विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.३ सन २०२३-२४ करीता साई आश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धुणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर (ब्लॅकेट) धुणे व गादीच्या खोळी धुणेकामी केलेल्या ई-निविदा प्रक्रिया रद्द करुन फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.

निर्णय क्र.७१० तहकुब.

(कार्यवाही- साई आश्रम भक्तनिवास)

-----------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.४ प्लॉस्टिक साहित्य खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र.७११ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- साई आश्रम भक्तनिवास)

-----------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.५ नवीन दर्शन रांगेकरीता संबंधीत विभागांसाठी आवश्यक कुशल व अकुशल कर्मचारी आऊटसोर्स ठेकेदारामार्फत घेणेबाबत.

निर्णय क्र.७१२ सध्या कार्यरत सेवा पुरवठादार यांचेशी असलेल्या कराराप्रमाणे अतिरिक्त कुशल व अकुशल एकुण ६८ कर्मचारी घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे. प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करुन मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही-कामगार विभाग/विधी विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६** **अतिरिक्त आकृतीबंध निश्चीती करणे व बिंदु नामावली तयार करणेसाठी श्री.त्र्यंबक अंबादास खैरे, सेवानिवृत्त लेखाधिकारी, महाराष्ट्र शासन यांची सेवा करार पध्दतीने नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.७१३** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.७** **साई धर्मशाळा परिसरातील सर्व इमारतीचे आतील व बाहेरील बाजूने रंगकाम करणे व इमारतीचे संडास, बाथरुमचे नुतनीकरण करणे कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारकास कार्यादेश देणेविषयी निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.७१४** **प्रस्ताव मंजूर. नियमानुसार अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम स्विकारुन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.८** **श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलच्या इमारतीमध्ये नव्याने अत्याधुनिक संगणकीय नेटवर्क Infrastructure उभारणी करणेसाठीचे संपुर्ण साहित्य (Active and Passive Network Support & Services) सह खरेदी करुन त्यांचे Implementation करणेबाबत.**

**निर्णय क्र.७१५** **अजेंडयावरील विषय नं.१३ सोबत या विषयावर केलेल्या चर्चेअंती दिलेल्या सुचनेनुसार चक्रिय पध्दतीने प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

-----------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.९** **श्री साईबाबा डिलक्स वॉल व श्री साईबाबा थ्रीडी डेस्क दिनदर्शिका-२०२४ छपाई करुन पुरवठा करणेकामी उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत पात्र दरधारकास कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.७१६ प्रस्ताव मंजूर.** **(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.६७९ ते ७१६ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ ९.०० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(पी.शिवा शंकर,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सिध्दाराम सालीमठ,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**